ज्योती



ज्योती दीवाळी अंक २०१३, शके १९३५

ईशान्य ओहायो मराठी मंडळाच्या वतीने

नमस्कार,

मुखपृष्ठावरील चित्र आहे दिवाळीच्या रात्री नटलेल्या भारतमातेची अंतराळातून घेतलेली छबी. तारकांचा चुरा करून टाकावा तस दिसतय. दिवाळी तसा आनंदाचा सण. अक्षरांच्या पिंजऱ्यात भावनांचा आनंद घालण्याचा प्रयत्न म्हणजे हा अंक. एक आणखीन वर्ष ज्योतीची धुरा सांभाळण्याची संधी दिल्याबद्दल मनापासून आभार. जे काही खरडलं ते वाचलत या बद्दल धन्यवाद. विंदांची एक कविता या निमित्ताने आठवते त्या दोन ओळी लिहून निरोप घेतो:

आज अगांतुक तुझी दिवाळी
उंबरठ्यावर सजली ग
आज घराची फुटकी कौले
अंधाराला हसली ग

कळावे लोभ असावा ही विनंती
आपला
मिलींद

साठे परिवार

अध्यक्षीय मनोगत

नमस्कार मंडळी,

बघता बघता कसा वर्ष निघून गेल याची जाणीव सुद्धा झाली नाही. ....जेव्हा दिवाळी ज्योती अंकासाठी मनोगत लिहायला बसले, तर मी कुठे कशी सुरुवात करू ह्याचा खूप वेळ विचार करावा लागला , कारण मला खरंच शब्द सापडत नव्हते आणी हे सगळ लिहिताना मला गहिवरून आल आहे ही अतिशयोक्ती नाहीय. एका वर्षाची अवधी एका मिनिटासारखी करून देण्याचं श्रेय संपूर्णपणे माझ्या कार्यकारिणीला द्यावेसे वाटतय . वर्षाच्या सुरुवातीला मकर संक्रांतीच्या हळदी-कुंकुमच्या कार्यक्रमात घाईघाईत आमची कार्यकारिणी तयार करण्यात आली होती. तेव्हा कोणालाच वाटलं नव्हत की आम्ही सगळे सोबत येउन प्रतिनिधित्व नसलेल्या मंडळाला आपल्या कुटुंबासारख इतक्या सहजतेने सांभाळून घेऊ . अडचणी नसलेली ही काळावधी जाणार नाही, अशी खात्री असूनसुद्धा मनापासून मला दीपाताई, स्वाती, निलेश, गौरी आणी वैजयंती ह्यांनी निसंकोच आधार दिला. विशालचा उत्साह आणी देविदासचे श्रम कार्यकारिणीत carry forward झाल्यामुळे एकदम कामाला लागायला अजुन सोपं झालं. असो ...... होळी आणी महाराष्ट्र दिवस या साठी विनायक गोखले ह्यांच्या मंडळीने धमाल केली व आपल्यापैकी काहींनी उत्कृष्टपणे लावणी आणी मंगलागौरीच्या गाण्यावर बसवलेले नृत्य सादर केले. पिकनिक नंतर गणपतीच्या कार्यक्रमासाठी "भैरव ते भैरवी " आणी वर्षाच्या शेवटी जादुगार रघुवीर ह्यांचा धडाकेदार जादू प्रयोग असे वेगवेगळे कार्यक्रम आपल्या करमणूकी साठी आम्ही संगठीत केले. मंडळाचा थोडं खर्च जास्त झाला तरी ही इतर मोठ्या मंडळांसारखे अत्योत्तम व सर्वश्रेष्ट कार्यक्रम आपल्याला बघायला मिळावेत अशी आमची सदभावना होती. त्या साठी आम्ही प्रचंड मेहनत घेतली. प्रत्येक कार्यक्रमाला जवळ जवळ ८-९ कलाकारांची ४-५ दिवसांसाठी आवभगत, कुरकुर न करता एकाग्रतेने committee नी जवाबदारी पाळली.

प्रथमच या वर्षी शाळा सुरु करण्याचा प्रकल्प हाती घेतला आणी त्यासाठी जो सहभाग संध्या, प्राची आणी निलेशचा झाला, त्याच्याबद्दल कितीही आभार मानल तर कमी असणार... ह्या वर्षी अजून एक नवीन विशेष गोष्ट म्हणजे ज्येष्ठ नागरिकांसाठी "उत्तरांग" हे स्थापित करण्यात आल आहे. पुढच्या वर्षी and for so many years to come आपल्या पुढच्या पिढीना ह्या दोन्हीही initiatives चा जास्तीत जास्त फायदा मिळू शकेल अशी अपेक्षा आहे. Online tickets sale, Facebook page, Google Drive अश्या कितीतरी नवीन features चा वापर या वर्षी सुरु करण्यात आला आहे. निसंदेह आपलया मंडळाची website दुसऱ्या संस्थांच्या तुलनेत अधिक professional झाली आहे. हे सगळं मला एकटीला माझ्या कार्यकारीणीशिवाय करता आला नसतं.

तुम्ही सगळयांनी माझ्यावर विश्वास ठेउन मला सेवा करायची ही संधी दिली त्याबद्दल आभार. चुकांबद्दल क्षमस्व. याच्यापुढे कोलंबसला असले तरी ही मन "ईशान्य ओहिओ मराठी मंडळातच" अडकलेल राहील आणी नेहमी आपल्या मंडळासाठी काम करायची कुजबुज राहील.

परंपरागत जसे मंडळात होत आल आहे त्याची खात्री ठेउन युवा मंडळीने पुढे येउन मंडळाला नवीन face द्यावा ही माझी नम्र विनंती.

आपली

अनुपा देवगावकर

अध्यक्ष, ईशान्य ओहायो महाराष्ट्र मंडळ


Happy Diwali and Best Wishes
from
Ramesh, Gaye & Gavhane Family

बोलण्याच्या नाना तऱ्हा

दिलीप खापरे

शब्द आणि शब्दांचं वाक्य किंवा वाक्यंच्या वाक्यं बोलण्याची एकेका भाषेची तसेच प्रत्येक व्यक्तीगणिक अथवा भौगोलिक परिस्थितीनुसार ढब बदलत असते. त्या ढबीतून त्या भाषेचा बोली ढंग, बोली स्वभाव प्रकट होत असतो. शब्द योजना, शब्दांवरचा जोर, शब्दांच्या घटकांवरचे आघात, उच्चारातील लकब, उच्चाररचनेचा आब हा एकेका भाषेचा त्या त्या प्रदेशातून, त्या त्या व्यक्तिच्या बोलीतून ठराविक स्वरूपात प्रकट होत असतो. याचं पटकन् लक्षांत येण्याजोगं उदाहरण म्हणजे सिनेमातील नट नट्यांचे बोलणे. आठवा ओम पुरी, शहारूख खान, दिलीप कुमार किंवा अजितचे बोलणे.

खरंतर एकूण बोलणं कसं हवं ? तर एखाद्याने न कंटाळता ऐकत रहावं असं. अर्थात् प्रत्येकजण मंजुळ मैनेसारखं बोलत नाही किंवा कावळ्यासारखे ओरडत नाही. पण स्वच्छ उच्चार, आटोपशीर वाक्य रचना, नेमके विचार मांडण्याचं तंत्र असावं हे मात्र निश्चित.

आता बघा, काहीजण काय करतात, बोलायला सुरूवात करतात, मूळ मुद्दा सोडून कोठेतरी भरकटत जातात, कोणाचंही ऐकून घेत नाहीत, किंवा थोडंसं थांबून कांहीतरी गूढ बोलल्याप्रमाणे अर्धवट थांबतात आणि कोठेतरी विचारात मग्न होतात.

काहीजण अगदी रूक्ष बोलतील, जणू तुमचा, विषयाचा, विचाराचा कांहीएक संबंध नाही. कधी कधी तसं नसतंही म्हणा, पण काय कळणार नाही का?

कांही जणांच्या बोलण्यांत खरखर असते, चरफड असते तर कांहींच्या बोलण्यांत उगाचंच गुळमटपणा असतो.

कांहींचं बोलणं उगीचच रागावल्याप्रमाणे असते. उदा. टेलिफोन मधले संदेश, वसकन् ती बाई अंगावर आल्याप्रमाणे ऐकवते की, या लाईनवरचे सर्व क्रमांक व्यस्त आहेत... तुम्ही फिरविलेला नंबर तपासून पहावा...

रेल्वे प्लॅटफॉर्मवरची अनाउन्समेंट तर अगदी जिवावर आल्याप्रमाणे असते, काही म्हणजे काही कळत नाही, प्रवाशांनी अंदाजाने समजून घ्यायचे.

कांहीजण उगाचंच भांडल्याप्रमाणे बोलतात, त्यांच्या शब्दांत कोल्हापुरी झटका असतो. प्रचंड उर्मटपणा असतो. कदाचित् ते त्यांच्या मनांत नसतेही, पण समोरच्याने काय समजायचे ना?

कांही एवढे तुसडे बोलतात, की त्यांना वाटतं समोरचा माणूस म्हणजे एक झेंगटच आहे. त्यांच्या बोलण्यांत नेहमी धुसपूस असते.

कांही जण किंवा कांही जणी उगाचंच एवढे लाडे लाडे बोलतात, की जणू आपले आणि त्यांचे जन्माजन्माचे नाते आहे. अगदी भांडतात सुद्धां तसेच. तर कांहीजण नेहमी हुंदके देत असल्यासारखे बोलतात, दचकल्यासारखे होते, की कांही गंभीर घडले की काय?

कोणताही विषय असो कांहीजणांचा चेहरा नेहमी सुतकी असतो, लग्नाचं आमंत्रण असो वा कोणी गेल्याची वार्ता असो, हे नेहेमी गंभीर.

या उलट बातम्या देणारे पहा, नेहमी चेहऱ्यावर हासू. अपघाताची बातमी सांगतांना सुद्धां हसत हसत सांगतील. आवाजात दिलगिरी नाही की खंत नाही.

पुढील पानावर....

Best Complements from

Tamaskar & Associates

Financial Planning Services

Our Team of Experts Offer:

Life, Health & Long Term Care Insurance
College Education & Planning
Pension & Retirement Distributions
Estate Planning & Other Financial services

ENHANCE YOUR WEALTH BY TAKING ADVANTAGES OF SECTION 419F/S, SECTION 412, SECOND TO DIE POLICY

Without wasting time surfing web internet lovers can get better deal on term-life, whole-life, universal life and second-to-die life insurance policies. We assure the best products. Enjoy our unique and cozy hospitality which no one provides. Try us and save your money.

Please call:

Y.K. Tamaskar for No Obligation Information

Tel: 440-729-8293
440-729-8296
Fax: 440-729-8296

बोलण्याच्या नाना तऱ्हा contd..

दिलीप खापरे

कांहीजण फोनवर बोलतांना एवढ्या जोरात बोलतात, काहीही रहस्य आजूबाजूच्या लोकांपासून लपत नाही. आपल्याला कमी ऐकू येते म्हणजे समोरच्यालाही कमीच ऐकू येते असे यांना वाटते आणि आवाजाची पट्टी वाढते. हा प्रत्यय नेहमी स्मशानांत येतो, आठवून पाहा जरा.

एक वेगळा प्रकार, बोलणे चालू करतांना हळू आवाजांत चालू करतात पण नंतर नंतर आवाज एकदम वाढत जातो, विनाकारणच.

कांही महाभाग बोलायला सुरूवात करतात, एखादा शब्द बोलतात आणि एकदम हसायला सुरूवात करतात. हसू आवरून पुन्हां बोलायला सुरूवात करतात पुन्हां वेगळ्याप्रकारे हसतात, अगदी मूळ मुद्दा गोल गोल फिरवतात.

काही महाभाग आपला मुद्दा पटविण्यासाठी मांडीवर किंवा पाठीवर थाप मारतात, तर काहीजण उगाचंच पोटात बोट खुपसतात. बहुतेक ही त्यांची जोडभाषा असावी. काहीजण बोलताना उगाचंच डोळे मिचकावतात, डोळे मोठे करतात, तर कांहीजण डोळे किलकिले करतात. आता काहीजण हळूच कानांत किंवा इतक्या हळू आवाजात बोलतात की, जणू जगातील एकमेव रहस्य त्यांनाच माहित आहे.

कांहीजण उगाचंच दम देत किंवा इशारे देत बोलतात--'लक्षांत ठेव, काय?', 'ऐकून घे', 'काय समजले बाबा', ' कळतं का मी काय म्हणतो ते?' वगैरे वगैरे.

कोणी कोणी तर वाघ मागे लागल्यासारखे बोलतात तर उलट कांहीजण म्हणजे संथ गती बातमीपत्रं असतात, असं वाटतं याच्या कानाखाली दोन वाजवाव्यात. काहीजण अगदी शुद्धलेखनाच्या नियमांप्रमाणे बोलतात, प्रत्येक शब्दानंतर पॉज. असं वाटतं की याला धाप लागली की काय? (आठवा-दिलीपकुमारचं बोलणं). अगदी ऐकणाऱ्याचा जीव टांगणीला लागतो.

काहीजण बोलतात तर त्यांच्या तोंडातून नुसता पाण्याचा फवारा उडत असतो, समोरच्याने सतत रूमाल धरावा.

अजून एक निराळीच तऱ्हा अशी आहे की, काहीजण बोलतच नाहीत, नुसते हूं हूं, बस आपणच काय ते समजायचे. भाई लोक तर प्रत्येक वाक्याला एक शिवी लोणच्यासारखी तोंडी लावतात.

अशा निरनिराळ्या तऱ्हा असतात, त्यापैकी आपण कोणत्या प्रकारात मोडतो याचा प्रत्येकाने स्वतःशीच विचार करून आत्मपरिक्षण करावे.



दिवाळीच्या शुभेच्छा

हे वर्ष तुम्हा सर्वाना सुखसमृद्धीचे जावो!

गावकर कुटुंबीय: साधना, रवि, तुषार, शुभांगी,

ऋजुता, विवेक, नयना, सजनी आणि सुहेल.

Wish you all a Happy Diwali &
Happy New Year

Pediatrics R US & Khadilkar Family

Office Location : Vidula Khadilkar, MD

5162 Broadway Avenue, Suite 4, Cleveland, OH 44127

Phone: (216) 429 0077

जय चा जय जय कार ....

Crain's Cleveland Forty Under 40 is a prestigious award in the North East Ohio. This recognition is awarded to rising business stars who are noted for their professional success and civic contributions. Jay was selected for this award for his achievements in the business world as well as his community service. After coming to Cleveland in 2007, in short 6 years, he rose to be the Head of Gaming, Travel & Internet investment banking practice with a portfolio of hundreds of millions of dollars; received Chairman's award, the highest employee award in KeyCorp and is quoted in news articles as an industry expert.

On community service front, Jay was a part of Cleveland Leadership Center's Cleveland Bridge Builders program where he was part of a team that assisted Bike Cleveland, an advocacy group for making Cleveland a more bike-able city; in developing strategy. He is also a mentor for iCleveland program. Recently, Jay has been selected as Associate Board member of Greater Cleveland Sports Commission.
Jay is on the executive leadership team of Asia Key Business Networking Group which focuses on inclusion and outreach to Asian community within KeyCorp and in the communities that KeyCorp operates in. Jay is actively involved in Asian Indian community in Greater Cleveland. He was elected as President of North East Ohio Marathi Mandal, a local Indian cultural organization in 2009. And, presently, he is on Executive Board of Federation of Indian Communities Association (FICA).

In Crain's Cleveland November 18, 2013 issue, there will be a feature on Jay and he will also be featured on the Forty Under 40 Facebook page. The Forty Under 40 awardee with most facebook likes will be able to donate $500 to his/her favorite charity. Jay has chosen "FICA's Project Sewa" which feeds the less fortunate as the charity for the donation. Please remember to 'Like" his Forty Under 40 facebook page and help FICA win $500.

गौरव अनुपाचा ...



INDIA INTERNATIONAL FRIENDSHIP SOCIETY

Dear Dr Anupa Deogaonkar

We feel pleased to inform you that the Grand Annual ceremony of the presentation of **"BHARAT GAURAV AWARD"** shall take place on 9th January 2014, at Hotel Le Meridian, New Delhi.

It remains our considered opinion that you have given a fight in life and your worthy example does inspire others towards certain remarkable achievement. We have, therefore, chosen to honour you with globally reputed **" BHARAT GAURAV AWARD"** and **CERTIFICATE OF EXCELLENCE** at the function.

At this event of **Global Friendship Day,** the Society confers "**BHARAT GAURAV AWARD** to luminous personalities in India and abroad, who have glorified India with outstanding contributions in their specialized fields, such as science & technology, education, services providers industry, politics and social work, peace and harmony, religious activities, arts and literatures, etc. To name a few of the past recipients of this most coveted Award are - late Her Holiness Mother Teressa, former Vice President of India, B. D. Jatti, Gen.G.V.Krishna Rao, Air Chief Marshal N.C.Suri, Joginder Singh, Former CBI Director, NRI business-magnate Vijay Mallya, super movie stars, like Dev Anand, Late Sunil Dutt, Rajesh Khanna, Raveena Tandon and Jayaprada, Singer Pankaj Udhas, famous cricket star Sunil Gavaskar and Kapil Dev.

Anga Kala Kathak Academy a premier institution of Kathak was founded by, and is under the artistic direction of Antara Datta who specializes in Lucknow gharana (style) of Kathak. She has received years of intensive training in Kathak under "Sringar Mani" Srimati Anuradha Nag and Srimati Kiran Chauhan (senior disciples of living legend Pandit Birju Maharaj)

For more information contact:
Antara Datta (Founder and Artistic Director)
Anga Kala Kathak Academy

Website address: http://www.antaradatta.com/
Visit us on facebook: Anga Kala Kathak Academy
email: angakalakathakacademy@yahoo.com
Phone: 330 419 3335(H) 425 462 7235(C)



Happy Diwali

Hemangi, Parag, Ruchi and Ishani Kale

डॉक्टर आशा प्रतिनिधी यांनी केलेली ही उदबोधक कविता

रक्तदाब नियंत्रण

फार वर्षांपूर्वी होती   जीवनाला संथ गती
भाजी-भाकरी पोटापुरती   भार पुरता देवावरती
आयुष्याची छोटी मिती   त्यातही समाधानी वृत्ती
रोज चालणे मैलोगणती   हृदयरोगाची कसली भीती !! १ !!

काळ सरकता पुढती पुढती   क्रांतीकारक सर्वीच प्रगती
अर्थार्जनाच्या संधी मिळती   खेड्यामधुनी शहरात धावती
टी.व्ही.फ्रिज अन् सुविधा किती, संगणक फोन येती हाती
वाहनांची नित वाढती गती   परी स्वतःची चाल विसरती !! २ !!

चमचमीत खाण्याच्या सोई   बर्गर पिझ्झा आणिक काही
चोचले जिभेचे अनाठाई   तेल मिठाचा मारा साही
नव्या युगाची नवी नवलाई   बैठ्या कामाची अपुर्वाई
व्यायामाची त्यात कुचराई   देई लठ्ठपणाची ग्वाही !! ३ !!

सदा सर्वदा घाई घाई   मिनिटभराची फुरसत नाही
चढाओढ ती ठाई ठाई   शिक्षण नोकरी धंद्यालाही
वाढीव गरजा अन् महागाई   त्यात जमेचा मेळ न राही
तंबाखू गुटखा दारूची खाई   अवघड विळखा न सुटे जराही !! ४ !!

रक्तदाब मग वाढत जाई   नकळत अवयव ग्रासत राही
वेदना हृदयाला देई   मुत्रपिंडा बाधा येई
मेंदू स्तंभित सुन्न होई   दृष्टी अंधुक धूसर पाही
उपचारातील खंड जराही   आमंत्रण आजारां मृत्युलाही !! ५ !!

रक्तदाब मधुमेहादी दुखणी   वाढत्या वयाची ही कहाणी
वेग वाढुनी युती साधुनी   दिसतात आज ती तरूणपणी
पाश्चात्यांची नक्कल करूनी   जीवनशैली त्यांची स्विकारूनी
पैसा पैसा मानुनी अग्रणी   आत्मघातकी अशी ही रहाणी !! ६ !!

माजला कली हा हाहाकारी   फिरवुनी देऊ त्या माघारी
ताण तणाव वासना हारी   संतुलीत वृत्ती घरी नि दारी
युक्त आहार बहु गुणकारी   व्यायाम रोजचा तनमन तारी
व्यसनमुक्ती व्रत अंगीकारी   निरोगी जीवन सूत्रे सारी !! ७ !!

इवलेसे रोप लाविलीये दारी ....

.

क्लिवलंडची मराठी शाळा Sept.2013 मधे सुरु झालीवय वर्षे . - ४१४ पर्यंतची जवळ जवळ १६ मुले याचा लाभ घेत आहेतक्लिवलंडचे हवामान व . विस्तार पाहताEast/West अशा दोन शाखा सध्या शिक्षकांच्या घरीच चालविण्यात येत आहेतमराठी . भाषा व संन्कृती याची गोडी आणि आवड मुलांमध्ये निर्माण व्हावी हाच आमच्या शाळेचा मुख्य हेतू अहे . BMM च्या सौजन्याने आणि अनुपाच्या अथक प्रयत्नाने लावलेले हे इवलेसे रोप लवकरच फोफावेल यात तिळमात्र शंका नाहीत्यासाठी . परिश्रम घेणारे आमचे सर्व विद्यार्थी, तीन शिक्षक संध्या -, प्राची आणि निलेश, तसेच वाहकाची भुमिका करणारे पालक, यांचे अगदी मनापासून आभार!

संध्या अशोक देशपांडे
क्लिवलंड मराठी शाळा
(440)734 3727

MANOJ GUPTA, CPA
614-344-4246

- Tax Preparation
- Accounting Services
- Payroll Services
- Certified Quickbooks Pro Advisor
- Bookkeeping
- Audit
- Financial Statement Preparation
- Creation of Corp., Partnership, LLC
- IRS Notices
- Buying and Selling a Business
- Sales Tax Services
- Commercial Loan Docs Preparation
- Foreign Bank Accounts Reporting/OVDI

- Did you do your own taxes? We review tax return for FREE!
- Are you subject to Foreign Bank Accounts Reporting Requirements? Contact us to find out what your options are.
- Contact us to find out if S-Corp. is better than LLC.
- Visit our website www.Gupta-CPA.com to access a wealth of free information relevant to immigrant community.

Manoj Gupta, CPA

Gupta & Associates, CPA, LLC
555 Metro Place North, Suite 100
Dublin, OH 43017

Ph: 614-344-4246
Fax: 866-541-5372

MG@Gupta-CPA.com
www.Gupta-CPA.com

ADP

intuit Certified ProAdvisor QuickBooks

॥ क ॥
{Khapre.org}
a public service initiative
|| www.khapre.org ||

शिक्षण आणि विद्यार्थी

दिलीप खापरे

ज्ञान हे धनसंपत्ती, पतप्रतिष्ठा, गाडी बंगला यापेक्षा श्रेष्ठ आहे, कारण जे तुम्ही आयुष्यभर कमावता त्याचा सांभाळ करण्यात, रक्षण करण्यात आपलं संपूर्ण आयुष्य निघून जातं. परंतु ज्ञान शेवटपर्यंत आपलंच रक्षण करतं. फक्त ते मिळवण्याची दिशा योग्य हवी. आपण सर्वजण शाळा-कॉलेजमधून शिकलो आहोत. स्वतःशीच प्रामाणिक राहून एका प्रश्नाचा शोध घ्या की, जे शिक्षण तुम्ही घेतलंत, जे व्षिय तुम्ही शिकलात, ते खरोखरच मुक्तपणे शिकलात, की एक ओझं म्हणून? आज हेच घडतंय प्रत्येक विद्यार्थी अभ्यासाचे ओझे वाहतोय. त्याच्या शिकण्यात मुक्तपणा असा नाहीच. तो शिकतोय ते केवळ मार्कांसाठी. कारण ती आजची काळाची गरज आहे. विद्यार्थ्यावर हा संस्कार आम्हीच, आमच्या समाजाने केला आहे. त्यामुळे शिकणे ही प्रक्रियाच बंद पडली आहे. विद्यार्थ्यांचे मूल्यमापन मार्कांवरून केले जात आहे.

आपला पाल्य हा आपल्या आयुष्याचा एक प्रोजेक्ट आहे, हे विसरून चालणार नाही. ‘ आम्हांला आमच्याच कामातून वेळ मिळत नाही’, ‘आजकालची मुलं कुणाचं ऐकतात का?’ ही वाक्यं उगाळणं बंद करायला पाहिजे. आमची मुलं आमचं ऐकत नाहीत, असे म्हणण्याची पाळी जेव्हा आपच्यावर येते तेव्हां पहिलं स्वतःचंच आत्मपरिक्षण करावं लागेल. बाकी सर्व गोष्टींवर खर्च करण्यापेक्षां मुलांच्या विचाराला, व्यक्तिमत्व विकासाला हातभार लावणारी पुस्तके जर आम्ही त्यांना त्यांच्या वयोमानानुसार, प्रसंगानुसार भेट म्हणून दिली आणि ती वाचावयाची संवय सुरूवातीपासून लावली शिवाय त्यातील विचारांची देवाण घेवाण करून सुसंवाद साधला तर मुलांच्या विचारात, आचारात, बोलण्यात योग्य तो बदल घडवून आणण्यास आपण सहाय्यभूत होणार नाही का?

शिक्षण ही एक प्रक्रिया आहे. अमुक एका कालावधीत विद्यार्थ्याला एखादी गोष्ट जमायला हवी, हा अट्टाहास चुकीचा आहे. हा अट्टाहासच त्या विद्यार्थ्यामध्ये केवल ताणतणावच नाही तर अभासाबद्दलचा तिटकारा निर्माण करतो. जेव्हां विद्यार्थी अभ्यास करत असतो, तेव्हां दिलेला अभ्यास लवकरात लवकर कसा पूर्ण होईल, हेच पहात असतो. कारण त्याच्याकडे वेळेचे नियोजन नसते. त्यामुळे तो अभ्यास करत आहे असं वाटत असेल तरी तो एक प्रकारे अभ्यासाचे ओझेच कसेतरी कमी करण्यांत गुंतलेला असतो. यासाठी केवळ अभ्यासाचं नियोजन नव्हे तर विद्यार्थ्याचंच एकूण नियोजन व्हायला हवे, आणि ते भविष्य घडविण्यासाठी अत्यंत गरजेचे आहे.

खऱ्या अर्थाने शिकलेली सुशिक्षित व्यक्तीच स्वतंत्र असते. तिचे विचार, निर्णय, कर्तृत्व हे सर्वस्वी तिचे स्वतःचे असते. ती कधीही कोणत्याही गोष्टीसाठी परावलंबी नसते. ती कोणत्याही मदतीची, सवलतीची वाट पहात नाही. कारण तिचा तिच्या कर्तृत्वावर पूर्ण विश्वास असतो.

पुढील पानावर....

शिक्षण आणि विद्यार्थी contd…

दिलीप खापरे

शिक्षणाचा मुख्य हेतू विद्यार्थ्याचा आंतरिक विकास करणे हा होय. ज्या विद्यार्थ्याचा आंतरिक विकास योग्य पध्दतीने होतो, त्याचा बाह्यविकास तेवढाच सक्षम होतो. सध्यां सर्वजण बाह्यविकास करण्यात गुंतलेले आहेत. समाजात सहकार्य, सर्जनशीलता आणि सहानुभूतीच्या दिशेने नेऊन स्वतःबरोबर समाज, राज्य, राष्ट्र उभारणीच्या कार्यात महत्वाची भूमिका बजावणारे शिक्षण विद्यार्थ्यांना देणे ही काळाची, गंभीर गरज आहे.

प्रथम तुमचा पाल्य खरोखरच जसा आहे तसा स्विकारा, तरच त्याच्यात खरी प्रगती होण्याचा संभव आहे. त्याला मार्कस् किंवा टक्केवारीव्या खोट्या कल्पनांमध्ये सजवून उभा करू नका. कारण पाठांतर करून लिहिलेल्या पेपरच्या गुणांवरून त्याची गुणवत्ता कधीच सिद्ध होत नाही. ती आपल्या पाल्याच्या जीवनातील एक मृगजळ असते, आणि हे समजेपर्यंत वेळ निघून गेलेली असते.

NEOMM Lifetime achievement award २०१३: डॉक्टर सरोज पागेदार



डॉक्टर सरोज पागेदार यांना या वर्षीचे Lifetime achievement award देण्याचा निर्णय NEOMM कार्यकारिणीने घेतला आहे. डॉ. पागेदार यांनी क्लीवेलंड येथील मराठी व गैर मराठी सामाजिक कार्यात मागच्या चार दशकात जो हातभार लावला त्याबद्दल मंडळातर्फे हे छोटेसे आभार. त्या मंडळाच्या आद्य सदस्यांपैकी एक. १९७७ साली मंडळाची स्थापना झाली तेंव्हापासून त्यांनी आणी अजीतनी अनेक प्रकारे मंडळाची धुरा सांभाळली आहे. फक्त NEOMMच नव्हे तर AIPNO आणी FICA या भारतीय समुदायाच्या संस्थांना त्यांनी घडवले व वाढवले. आणी सगळ्यात कौतुकास्पद म्हणजे हे सर्व त्यांनी आपली बिझी मेडीकल प्राक्टीस असतांना केले.

या वर्षीच त्या व अजीत कॅलिफोर्नियाला रहायला गेले आहेत. क्लीवलंड मधील सर्व मराठी मित्रांतर्फे त्यांचे शतशः आभार.

माझ्या तीन कविता

मिलींद देवगावकर

हळू हळू स्वप्नांच्या कुशीत मी जातो
मिटलेल्या डोळ्यांच्या सावलीत मी जातो

गर्दीत माणसांच्या राहतो मी जरी
माझ्याच त्या सुन्या मैफिलीत मी जातो

आव्हान रोज देतो पापण्यांना झोपेचे
रोज माझ्या रात्रींना जागवीत मी जातो

मी जरी उजेडाच्या वाहतो मशाली
भोवताली अंधाराच्या संगतीत मी जातो

अंधाराच्या थेंबांतून रात्र गळू लागली
डोळ्यात कोंडलेली स्वप्ने छळू लागली

आंधळ्या न्यायदेवतेला ऐकले की दृष्टी आली
घाबरुन सैरवैरा माणसे पळू लागली

लांच घेऊन सूर्याला काल विकले आम्ही
उमजेना आज कशी पूर्व उजळू लागली

सत्याच्या धुमकेतूचा असा उल्कापात झाला
बेइमान चरण्याची कुरणे जळू लागली

दगडाच्या मुर्तीत आज अचानक प्राण आले
भक्त कटाक्षाने आता मंदीरे टाळू लागली

तुटलेल्या ताऱ्याला काय वाटले होते
लेणे हे नक्षत्रांचे असहाय्य झाले होते

की एकाकी गडद अंधार त्याच सोसवीत नव्हता
धरतीचा करुण गांधार मात्र बोलवित होता

नभपटलाचा राजा तो, की होता किंचीत वेडा
झाला क्षणात नाहीसा, बेफाम उधळीत घोडा

अमरत्वाचा होता गळ्यात त्याच्या फास
खरेच होता तो, की होता नुसता भास

अढळ आसनाला कंटाळला तो फार
चिखलावर कमळाचा होई जसा भार

मृत्यूशी सलगी करता हे तेज झळकले होते
तुटलेल्या ताऱ्याला काय वाटले होते

CME TRAVELS

Presents Mediterranean Cruise

Join us for the Mediterranean Cruise 2014 on Norwegian Epic
7 day Barcelona to Barcelona (Spain)
July 6 - 13, 2014
Dr. Durve at mjdurve@sbcglobal.net or 440-845-7272

ITINERARY

Date	Port	Arrive	Depart
July 6	Barcelona (Spain)		6:00pm
July 7	Fun Day at Sea		
July 8	Naples / Pompeii (Italy)	7:00am	7:00pm
July 9	Civitavecchia (Rome)	6:00am	7:00pm
July 10	Livorno (Florence/Pisa)	7:00am	7:00pm
July 11	Cannes (France)	8:00am	6:00pm
July 12	Palma Majorca	1:00pm	8:00pm
July 13	Barcelona (Spain)	7:00am	

PRICE as low as $1119 / pp.   3rd & 4th passenger is the same cabin $599

THE ABOVE ARE CRUISE ONLY RATES AND ARE BASED ON DOUBLE OCCUPANCY.
Government taxes $114.19
CANCELLATION INSURANCE (HIGHTLY RECOMMENDED) $129
Deposit of $500/pp due NOW. $50 pp on board credit
Limited rooms accommodating 4 passengers.

FINAL PAYMENT February 1, 2014
Superb meals, friendly Casino, Lavish Vegas-style Shows, Pampering Service and Fabulous Destinations.

माझ्या बारा कमांडमेंट्स्
रवि गावकर

खूप वर्षापूर्वी ***टेन कमांड्मेंट्स्*** ही मूव्ही बघितली होती. त्यात ’मोझेस’ला ’माउंट सायनाय’ या पर्वताच्या शिखरावर प्रत्यक्ष देव या दहा कमांडमेंट्स्-म्हणजे ज्यू लोकांनी आयुष्य कसे जगावे याविषयींचे नियम-देतो आणि मोझेस त्या लिहून घेतो. या नियमांनुसार जो वागेल तो पुण्य मिळवेल आणि जो याप्रमाणे वागणार नाही तो पापाचा धनी होईल अशी ही शिकवण.

आपल्या हिंदु धर्मातही माणसाने आयुष्य कसे जगावे याची शिकवण हजारो वर्षापूर्वी ऋषीमुनींनी देऊन ठेवलेली आहे. वेद, उपनिषदे, पुराणे या स्वरूपात या सर्व गोष्टींचा उहापोह झालेला आहे. मनूने ’मनुस्मृती’त समाजाच्या वेगवेगळ्या घटकातील लोकानी कसे वागावे याविषयींचे नियम सविस्तरपणे लिहून ठेवलेत. भगवद्गीतेत या सगळ्यांचे सार सापडते. अखेर प्रत्येक माणसाला, स्वतंत्र विचारशक्ती प्राप्त झाल्यानंतर, आपले स्वत:चे जीवन कसे जगायचे हे स्वत:च ठरवावे लागते आणि त्याप्रमाणे आयुष्य जगण्याचे काही नियम स्वत:च ठरवावे लागतात. मग ते पाच असोत, दहा असोत की पंधरा असोत.

अनेक वर्षांच्या अनुभवावरून मी माझ्या आयुष्याचे जे काही नियम बनवलेत ते असे:-

१. जीवनामध्ये ध्येय पाहिजे आणि ते गाठण्यासाठी कायम प्रयत्नशील राहिले पाहिजे. वास्तविक प्रत्येक ध्येय अनेकांगी असते म्हणजे एकाच ध्येयात अनेक ध्येये सामावलेली असतात. एखाद्या पर्वताच्या शिखरावर पोचण्यासाठी जशा अनेक लहानमोठ्या टेकड्या, अडथळे, पार करून जावे लागते तसेच काहीसे. शिवाय आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यावर वेगवेगळी ध्येये असू शकतात, नव्हे असतातच. आपण आपले ध्येय स्वत:च्या कुवतीनुसार ठरवायचे असते आणि आपली कुवत आपल्याला आलेल्या अनुभवावरून समजत जाते. *Not Failure but Low aim is Crime!* म्हणजे *अपयश नव्हे तर उच्च दर्जाचे ध्येय न ठेवणे हा गुन्हा आहे!* हे सुवचन शाळेत असतानाच माझ्या कानावर पडले होते. मला त्याची खूप मदत झाली. याच संदर्भात रॉबर्ट केनेडीने उल्लेख केलेली पुढील दोन वाक्ये मला आठवतात: "Some men see things as they are and say ’why?’ I dream things that never were and say ’why not?’" एकोणिसाव्या शतकातील जर्मन कवी आणि नाटककार गटे (Goethe) याने म्हणून ठेवलेय: "If you can imagine it, you can achieve it." या सगळ्याचा सारांश “मनात आणले तर आपण काहीही करू शकतो!”

२. *कायदा पाळा गतीचा काळ मागे लागला, थांबला तो संपला!* प्रसिद्ध कवि माधव ज्यूलियन यांच्या कवितेतील अतिशय स्फूर्तिदायक अशी ही एक ओळ आहे. किती सत्य भरलेले आहे यात! आजच्या *कंप्यूटर-ईमेल-आयपॅड-आयपॉड-आयफोन*च्या आणि *जागतिकीकरणा*च्या जमान्यात तर या उक्तीनुसार वागण्याची अतिशय जरुरी आहे. आजच्या जमान्यात आयुष्य जगणे ही एकप्रकारची शर्यतच झालेली आहे आणि जो या उक्तीनुसार वागणार नाही तो या शर्यतीत मागे पडून नामशेष होण्याची भीती निर्माण झालेली आहे.

३. कुणाचाही द्वेष न करता सर्वांवर प्रेम करत राहण्याची शिकवण मनाला लावून घेतली पाहिजे. आप्तेष्ट, शेजारी-पाजारी, सर्वसाधारण समाज हे सर्व घटक यात समाविष्ट आहेत. सर्व प्राणिमात्राविषयी भूतदया आणि निसर्गावरील प्रेम यांचा पण यात समावेश होतो. आपण एखाद्या व्यक्तीचा द्वेष करत असतो

त्यावेळी त्या व्यक्तीला याची जाणीवच नसते त्यामुळे तिचे काहीच नुकसान होत नाही. याउलट आपलेच मन विनाकारण त्यात गुंतून राहून आपण स्वत:चेच नुकसान करून घेत असतो.

४. लोकांनी आपल्याशी जसे वागावे असे आपल्याला वाटत असेल त्याप्रमाणे आपणच अगोदर त्यांच्याशी तसे वागायची सवय लावून घेतली पाहिजे.

५. माणूस हा समाजप्रेमी आहे. दोन व्यक्ती एकत्र आल्या की साहजिकच संभाषण हे होणारच. आणि त्या संभाषणानुसार त्या दोन व्यक्तीतील संबध निर्माण होणार. अखेर संभाषण ही एक कला आहे. ती आत्मसात करायची असेल तर स्वत: बोलण्यापेक्षाही दुसऱ्यांचे ऐकून घेणे याला जास्ती महत्व दिले पाहिजे.

६. प्रत्येकाने स्वत:चे शारीरिक आणि मानसिक आरोग्य बळकट ठेवण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे. ही आठवड्यातून किवा महिन्यातून एकदा करण्यासारखी गोष्ट नाही. योग्य आहाराएवढेच या गोष्टीला महत्व आहे. या गोष्टीचे एक प्रकारे व्यसनच जडले पाहिजे. Ageless Body and Timeless Mind या डॉ. दीपक चोप्राच्या पुस्तकात त्याने दीर्घायुष्याची गुरुकिल्ली दिलेली आहे. त्यातील सर्वात महत्वाची गोष्ट मला आठवते ती म्हणजे कुठलीही गोष्ट, कुठलेही काम करत असताना त्यात पूर्ण रस घेऊन त्या करणे. म्हणजे “हे काम आहे” ही भावनाच मनांतून निघून गेली पाहिजे. त्याऐवजी ते काम पार पाडत असताना त्यातील अंगभूत गोडी चाखण्याची सवय लावून घेतली पाहिजे. माझी आई याचे एक जिवंत उदाहरण होते. अगदी पंचाहत्तरी ओलांडल्यानंतरही सक्काळी उठून केरसुणीने सगळ्या घरातील केर काढण्यापासून, भाजी निवडून ती चिरून ठेवणे, फणसपोळी बनवणे, येणाऱ्या-जाणाऱ्या पाहुण्यांची आणि नोकरचाकरांची चौकशी करणे, गावातील अडल्यानडलेल्यांना शक्य ती मदत करणे या सर्व गोष्टीतून तिने आनंद लुटला. अचानक झालेल्या मेंदूतील रक्तस्त्रावाने वयाच्या शहाऐंशाव्या वर्षीच तिने या जगाचा निरोप घेतला. नाहीतर ती अजून बरीच वर्षे जगू शकली असती.

७. प्रत्येकाने नेहमीच्या कामाव्यतिरिक्त काहीतरी छंद लावून घेतले पाहिजेत. चाकोरीचे जीवन जगताना अधूनमधून येणारा कंटाळा घालवण्यासाठी या छंदांची खूप मदत होते. विशेषत: निवृत्तीनंतर तर यांची खूपच मदत होते.

८. नेहमी सकारात्मक वृत्ती (positive thinking) ठेवली पाहिजे. “मी दुर्बल आहे,” “मला हे जमणार नाही” हे विचार मनातून काढून टाकले पाहिजेत. याऐवजी “मी स्वयंभू आहे,” “मी त्या परमात्म्याचा अंश आहे” हे विचार मनात बाळगले पाहिजेत. त्या सकारात्मक वृत्तीच्या बळावरच आपली कामे पार पडतात याचा मला प्रत्यक्ष अनुभव आहे. नाहीतरी प्रयत्न करत राहाणे एवढेच आपल्या हातात असते नाही का?

९. आपल्यावर एखादे संकट कोसळले किवा एखादी दुर्धर आपत्ती आली तर आपल्या मनात विचार येतो “हे संकट, ही आपत्ती माझ्यावरच का?” याऐवजी “माझ्यावर का नाही?” असा विचार करायला शिकले पाहिजे. अशावेळी युद्धात जखमी होऊन हातपाय गमावलेल्या माणसांचा विचार करावा; अपघाताने

एखाद्याची दृष्टी गेलेली असते अशा माणसाचा विचार करावा; जगण्यासाठी पुरेसे अन्नही मिळत नाही अशा जगातील कोट्यवधी लोकांचा विचार करावा; म्हणजे आपल्यावरची संकटे आणि आपत्ती यांच्याकडे बघण्याचा एक सकारात्मक दृष्टिकोन तयार होईल. आपण किती सुखी आहोत याची जाणीव होईल.

१०. नेहमीच्या आयुष्यात घेण्याऐवजी देण्याची सवय लावून घेतली पाहिजे. धन, विद्या, कला, प्रेम, सहानुभूती जे जे काही शक्य आहे ते ते इतरांना देत राहावे. मानवी जीवन देण्यासाठी आहे, घेण्यासाठी नाही. आईच्या नि:स्वार्थी प्रेमाएवढे दुसरे ज्वलंत उदाहरण मिळू शकेल का?

११. शक्य असेल त्याप्रमाणे महापुरुषांच्या सहवासात वेळ घालवावा. शक्य नसेल तर त्यानी लिहिलेले ग्रंथ वाचावेत, त्यांची चरित्रे वाचावीत. हे महापुरूष केवळ धर्मग्रंथातूनच येण्याची जरुरी नाही. ते कुठल्याही क्षेत्रातील असू शकतात. भारतरत्न विश्वेश्वरय्या हे एक महापुरुष होते; भारतरत्न पं. भीमसेन जोशी महापुरुषच होते आणि त्यांच्यासारखे इतर अनेक कलाकार महापुरुषच होते किवा अजूनही आपल्यात आहेत. मार्टिन ल्यूथर किंग एक महापुरुष होता; स्टीव्ह जॉब्स् एक महापुरुष होता; बिल गेट्स एक महापुरुष आहे. अशी कितीतरी उदाहरणे सापडतील.

१२. अखेर सर्वात महत्वाची गोष्ट. देवावर श्रद्धा पाहिजे. देव म्हणजे दुसरा तिसरा कुणी नसून जगातील-या विश्वातील-प्रत्येक प्राणिमात्राना प्रेरणा देणारी ती अद्भुत आणि नैसर्गिक शक्ती. ह्या शक्तीचा अंश सर्व प्राणिमात्रात असतो म्हणूनच जीवनाचा हा अखंड प्रवाह सुरू आहे. ह्या नैसर्गिक शक्तीची अनुभूती घेण्यासाठी दिवसातील काही वेळ शांत चित्ताने बसावे. शहरातील माणसानी अधूनमधून गजबजत्या वातावरणापासून लांब जावे. जमल्यास एखाद्या टेकडीवर किवा खेडेगावात जावे; आकाशामध्ये बघावे; निसर्गाची व्यापकता आणि भव्यता अनुभवावी. “मी किती सुखी आहे” असा विचार करण्याची सवय लावून घ्यावी.

रवि गावकर

व्यथा

विलास देसाई

(हि कविता त्या सर्व तरुणींना अर्पण
ज्या बलत्काराच्या बळी ठरल्या.)

का रे देवा तुच मजला सौंदर्य देउन धाडले
काय होते पुर्वसंचित माझे जे ह्या नराधमांस भक्षविले.
दिसली न माझ्यात त्यांना माता भगीनी त्यांसी.
क्रुरकर्मा कसे झाले ह्याच मातेच्या उदरी

ते कुणीही असोत तरी मी तर तुझी भक्त होते.
मग अत्याचारावेळी तु कुठे होतास रे
परित्रायाण करण्यासाठी सवड ही नाही होती
तुजला म्हणूनच ह्या दुष्कुत्याचे विनाश नाहे झाले
द्रौपदीच्या धावेस धावणार्या तु केशवा
माझी लाज लुटताना कुठे दडलेलास रे?

मर्यादा पुरुषोत्तम तु रामा , ज्याने दशाननास मर्दिले
माझे हरण होत असता कुठे गेला तुझा अक्षय भाता
आणि गांडीव रे ?

महिषासुर मर्दीनी तु दशप्रहर धारीणी.
नवदुर्गा आदिशक्ती सकळांची माता तु.
कुठे गेली होतीस जेव्हा मजवर हे दैत्य अत्याचार करता
का एक तरी त्यातला तु नाही वधीला?

देवांचे हि दगड जाहले धर्म मेला अधर्मा तळी
माणसां कडून काय अपेक्षू नको सहानभूती.
सर्वानी परी डोळे मिटता एक उमेद पहाते
बघू मजला ती अंध न्यायदेवता का न्याय देते?

Diwali Greetings
From
Health R Us LLC.
An international total
healthcare solutions platform
“we heal the healers”
Anupa and Milind
Deogaonkar
Happy Diwali

Balance **Diversification** **Significance**

B D S

Financial Network

Today's decisions shape tomorrow's realities.

Let an independent financial advisor help you prepare a plan that puts your interests and objectives first.

Call us today for your **financial checkup** @ **440-248-5625**.
Let us show you how we can **help.**

Ashok Shendure, MS, MBA, CFP® CEBS®, AIF®, RLP®
Rajanee Shendure, MBA, CFP®, AIF®
Smita Samant, CFP, AIF®

www.bdsfn.com
*30405 Solon Road **#16***
*Solon, Ohio **44139***

PLANNING Pays Off!℠

Securities and advisory services offered through Commonwealth Financial Network, member FINRA/SIPC, a registered investment adviser.